CNR No. MHSI01-000114-2015

## नियमित दिवाणी पुनर्वाद क्र. २८/२०१५ मधील नि. ४३ वरील आदेश.

(बाळकृष्ण नारायण चव्हाण–पुनर्वादी वि. आप्पा बाबाजी कुंजरकर–उत्तरवादी)

.....

प्रस्तुतचा अर्ज पुनर्वादी यांनी उत्तरवादी क्र. २ड–श्रीमती मंदा बापू शिंगे, उत्तरवादी क्र.१४–सुलोचना सोमाजी चव्हाण व उत्तरवादी क्र.१६–मालिनी विठ्ठल राणे यांचा मृत्यू झाल्यामुळे व त्यांचे मृत्यूदाखले व वारसांची नांवे प्रयत्न करुनही सापडलेली नसल्यामुळे पुनर्वादपत्रातील त्यांची नांवे कमी करण्याची परवानगी मिळणेकामी दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जाचे व उत्तरवादीनी दाखल केलेल्या म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

३. अभिलेखावरील नि.३९, १८ व १९ वरील बेलिफ अहवालावरुन उत्तरवादी क्र. २ड, १४ व १६ हे मयत असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करण्यास कोणतीही बाधा दिसून येत नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**– आदेश –**

१. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. पुनर्वादी यांनी उत्तरवादी क्र. २ड, १४ व १६ यांची नांवे पुनर्वादपत्रातून कमी करुन नियमानुसार आवश्यक ती दुरुस्ती विहीत कालावधीमध्ये करावी.

सही/–

दिनांकः– १५/०२/२०२३

(संजय जु. भारुका)
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
सिंधुदुर्ग–ओरोस.